ePaper
| वर्ष - 7 | अंक - 162 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 18 ऑक्टोबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# भाजपा पदाधिकाऱ्याकडून पोलीस अधिकाऱ्याला धक्काबुक्की!




## आतील पानांत
- नेदरलँड्सचा दक्षिण आफ्रिकेला धक्का!
- 2040 पर्यंत चंद्रावर मानव पाठवणार!
- भाजपाने महाराष्ट्र विकला : प्रणिती शिंदे
- अपघातांची जबाबदारी किती टाळणार?


# पिंपरी महापालिकेत प्रमोशनचा धमाका!

## एकाच दिवशी विविध विभागातील 137 अधिकारी, कर्मचाऱ्यांना बढत्या

### महापालिकेतून दर महिन्याला 25 ते 30 अधिकारी, कर्मचारी होतात सेवानिवृत्त स्वेच्छानिवृत्ती



“पूर्वी एलएसजीडी नावाची परीक्षा होती. २०२० मध्ये विभागीय परीक्षा घेण्याचे ठरले. पूर्वी एलएसजीडी परीक्षा झालेली कर्मचारी आहेत. यापूर्वीच्या आयुक्तांनी एलएसजीडी परीक्षाच विभागीय परीक्षा गृहित धरून पदोन्नती दिली. त्यानुसारच आताही एलएसजीडी हीच विभागीय परीक्षा गृहित धरून पदोन्नती दिली आहे. नोकरी लागल्यापासून दोन वर्षात ही परीक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे आहे मात्र, काही कर्मचारी परीक्षा नापास झाले तर काहींनी परीक्षाच दिली नाही. त्यामुळे त्यांना पदोन्नती देण्यात आली नाही.”

**–विठ्ठल जोशी,** उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेतील विविध विभागातील १३७ अधिकारी, कर्मचाऱ्यांना एकाच वेळी बढत्या देण्याचा निर्णय प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांच्या प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे महापालिकेत दिवाळीपूर्वीच बढत्यांचा धमाका झाला आहे. महापालिकेतून दर महिन्याला २५ ते ३० अधिकारी, कर्मचारी सेवानिवृत्त अथवा स्वेच्छानिवृत्ती होतात. वरिष्ठ पदावरील व्यक्तीची सेवानिवृत्ती झाल्यानंतर त्या पदावर पदोन्नतीने अधिकारी, कर्मचाऱ्यांची भरती केली जाते. सोमवारी महापालिकेत पदोन्नती समितीची बैठक झाली.**

अधिकारी, कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवा ज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग, संगणक अर्हता आदी तपशील पडताळून पाहण्यात आला. त्यानंतर पदोन्नती समितीच्या शिफारसीनुसार कार्यकारी अभियंता १, उपअभियंता १, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी १, कार्यालय अधिक्षक २१, मुख्य लिपिक ९०, परिचारिका प्रमुख (इनचार्ज) १४, बीजतंत्री ३, गटनिदेशक ३ , कनिष्ठ अभियंता ३ अशा १३७ जणांना विविध पदावर बढत्या देण्यात आल्या आहेत.

### पदोन्नतीपासून वंचित ठेवल्याचा लिपिकांचा आरोप

महापालिका सेवाप्रवेश नियमावलीस २०२० मध्ये शासनाने मान्यता दिली आहे. नियमातील तरतुदीनुसार विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यापूर्वी विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. मात्र, ३ वर्षे कालावधी होऊनही पालिकेने विभागीय परीक्षेचे धोरण निश्चित केलेले नाही.

त्यामुळे सेवा प्रवेश नियमावली मंजूर होण्यापूर्वीच्या अहर्तेनुसार एलएसजीडी (विभागा अंतर्गत) परीक्षेलाच अर्हतकारी विभागीय परीक्षा गृहीत धरून पदोन्नती देण्याचा निर्णय तत्कालीन आयुक्तांनी घेतला होता. त्यानुसार यावेळेसही कार्यवाही केली. मुख्य लिपिक पदासाठी पात्र असूनही ४० सेवाज्येष्ठ कर्मचाऱ्यांना विभागीय परीक्षा, पूर्वीचे अहर्तेनुसार ग्राह्य धरण्यात येणारी एलएसजीडी परीक्षा उत्तीर्ण नसल्याने पदोन्नती पासून वंचित राहावे लागले आहे. कर्मचाऱ्यांना विविध कारणांमुळे प्रशासनामार्फत एलएसजीडी परीक्षेस बसण्याची संधी देण्यात आली नाही. ही बाब पूर्णतः नैसर्गिक न्याय तत्वाच्या विरोधास असून त्यामुळे कालबद्ध पदोन्नतीपासून मुकावे लागल्याचा आरोप लिपिकांनी केला आहे.

---

# पिंपरीतील फेरीवाल्यांची कागदपत्रे जमा करण्यासाठी उदासिनता

## शहरात 19 हजार 697 फेरीवाले मात्र पाच हजार 75 फेरीवाल्यांनी कागदपत्रे जमाच केली नाहीत

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या वतीने शहरातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण पूर्ण होऊन हरकतींचा निपटारा झाला आहे. शहरात १९ हजार ६९७ फेरीवाले असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र यामधील तब्बल पाच हजार ७५ फेरीवाल्यांनी कागदपत्रे महापालिकेकडे जमाच केली नसल्याचे समोर आले आहे. या फेरीवाल्यांना कागदपत्रे जमा करण्यासाठी २० ऑक्टोबरपर्यंत मुदत दिली आहे.**



उद्योगनगरी अशी ओळख असलेल्या शहरात कामगार, कष्टकरी, उद्योजक यांचा अधिवास अधिक आहे. शहरात मोठ्या प्रमाणात फेरीवाल्यांची संख्या वाढली आहे. महापालिकेच्या वतीने शहरातील पथारीवाल्यांचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्गत खासगी एजन्सीची नेमणूक करण्यात आली होती. त्यांच्यामार्फत हे सर्वेक्षण करण्यात आले.

“शहर फेरीवाला समितीची २० ऑक्टोबरला बैठक होणार आहे. या बैठकीत फेरीवाल्यांसाठी झोन निश्चित करण्यात येणार आहेत. तोपर्यंत जेवढे फेरीवाले कागदपत्रे जमा करतील, त्यांनाच मान्यता दिली जाणार आहे.”

**– विजय सरनाईक,** सहायक आयुक्त, भूमी आणि जिंदगी विभाग

शहरातील फेरीवाल्यांच्या सर्वेक्षणाला १ नोव्हेंबर २०२२ रोजी सुरुवात झाली. त्यानंतर सर्वेक्षण पूर्ण न झाल्याने दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली. १० जानेवारीपर्यंत दिलेल्या अंतिम मुदतीत शहरात १९ हजार ६९७ फेरीवाले आढळून आले आहेत. या फेरीवाल्यांच्या अंतिम यादीला भूमी आणि जिंदगी विभागाने मान्यता दिली, मात्र यामधील १३ हजार ९८९ फेरीवाल्यांनी ऑफलाइन आणि ऑनलाइन कागदपत्रे जमा केली आहेत. यामधील पाच हजार ७५ जणांनी कागदपत्रे जमा केलेली नाहीत.

# मेट्रो प्रकल्पाचा खर्च 2 हजार कोटींनी वाढला!

## केंद्रीय मंत्र्यांच्या आढावा बैठकीत तीन आमदार उपस्थित

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मेट्रो स्टेशनच्या जागेत करावे लागलेले बदल, कोरोनामुळे झालेला विलंब आणि भूसंपादनाचा वाढलेला खर्च यामुळे मेट्रो प्रकल्पाच्या खर्चात जवळपास दोन हजार कोटी रुपयांनी वाढ झाली आहे", अशी माहिती परराष्ट्र राज्यमंत्री व्ही. मुरलीधरन यांनी मंगळवारी दिली. दरम्यान, महामेट्रोने हाती घेतलेले दोन्ही मेट्रोमार्ग मार्च २०२४ पर्यंत पूर्ण होतील, असा दावाही त्यांनी केला.**



### खर्चास मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरू

» पुणे शहर व परिसरात पायाभूत सुविधांची कामे गतीने सुरू आहेत. त्यामुळे पुणे शहर हे देशासाठी विकासाचे मॉडेल ठरणार आहे, असा विश्वास मुरलीधरन यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, "पुणे शहरात वनाज ते रामवाडी मेट्रो प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. स्वारगेट येथील मेट्रो स्टेशनचे काम पूर्णत्वास आले आहे. मार्च २०२४ पर्यंत मेट्रो प्रकल्पाचे काम पूर्ण होईल. मेट्रो प्रकल्पासाठी सुमारे ११ हजार ४२० कोटी रुपये खर्च अपेक्षित धरला होता. परंतु खर्चात वाढ होऊन १३ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च होईल. वाढीव खर्चास मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरू आहे."

जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची (दिशा) बैठक व्ही. मुरलीधरन यांच्या उपस्थित आज झाली. त्यानंतर पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. या वेळी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, आमदार भीमराव तापकीर, संजय जगताप आणि रवींद्र धंगेकर उपस्थित होते. १७ खात्यांच्या सुमारे ४१ योजनांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. पुणे शहर व परिसरात पायाभूत सुविधांची कामे गतीने सुरू आहेत. त्यामुळे पुणे शहर हे देशासाठी विकासाचे मॉडेल ठरणार आहे, असा विश्वास मुरलीधरन यांनी व्यक्त केला.

ते म्हणाले, "पुणे शहरात वनाज ते रामवाडी मेट्रो प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. स्वारगेट येथील मेट्रो स्टेशनचे काम पूर्णत्वास आले आहे. मार्च २०२४ पर्यंत मेट्रो प्रकल्पाचे काम पूर्ण होईल. मेट्रो प्रकल्पासाठी सुमारे ११ हजार ४२० कोटी रुपये खर्च अपेक्षित धरला होता. परंतु खर्चात वाढ होऊन १३ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च होईल. वाढीव खर्चास मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. पालखी मार्ग, पुणे-मिरज रेल्वे मार्ग, अमृत योजना, स्मार्ट सिटी योजना यांचाही या बैठकीत आढावा घेण्यात आला असल्याचे सांगून मुरलीधरन म्हणाले, "लोहगाव विमानतळ विस्तारीकरणाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. लवकरच त्यांच्या उद्घाटनाची तारीख निश्चित करण्यात येईल. केंद्र आणि राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी योजनांचा आढावा दिशा समितीच्या बैठकीत घेतला जातो. यापूर्वी समितीच्या नियमित बैठका होत होत्या. यंदा प्रथमच दीड वर्षानंतर समितीची बैठक झाली. यात जिल्ह्यातील २१ पैकी केवळ तीनच आमदार उपस्थित होते. त्यामध्ये भाजपचे एक तर कॉंग्रेसच्या दोन आमदारांचा समावेश होता. पुणे शहरातील एकही खासदार या बैठकीला हजर नव्हते. याबाबत मुरलीधरन यांना विचारले असता, त्यांनी यावर उत्तर देणे टाळले. शहर व जिल्ह्यातील महत्वकांक्षी प्रकल्प आणि योजना मार्गी लावण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची असताना भाजपसह सर्वच पक्षाच्या आमदार आणि खासदारांच्या गैरहजेरीची चर्चा बैठकीनंतर रंगली.

# २० रुपयांत एक लाखाचा विमा!

## 422 रुपयांत दोन लाखांचे मिळणार संरक्षण

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील अकृषी विद्यापीठे, तंत्रशिक्षण विद्यापीठ, संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी नव्या स्वरुपात विद्यार्थी जीवन आणि अपघात विमा योजना लागू करण्याचा निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतला आहे.**



### 62 रुपयांत पाच लाखांचा विमा

» विद्यार्थ्यांना ६२ रुपयांत पाच लाखांचा अपघात विमा, तर २० रुपयांत एक लाखाचा विमा मिळणार असून, विद्यार्थी वैद्यकीय विमा योजनेत ४२२ रुपयांत दोन लाखांचे संरक्षण मिळणार आहे. उच्च शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध केला. उच्च शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली विमा योजनांसाठी समिती स्थापन करण्यात आली होती.

विद्यार्थ्यांना ६२ रुपयांत पाच लाखांचा अपघात विमा, तर २० रुपयांत एक लाखाचा विमा मिळणार असून, विद्यार्थी वैद्यकीय विमा योजनेत ४२२ रुपयांत दोन लाखांचे संरक्षण मिळणार आहे. उच्च शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध केला. उच्च शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली विमा योजनांसाठी समिती स्थापन करण्यात आली होती. समितीच्या शिफारसींनुसार विद्यार्थी विमा योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. योजनेच्या अंमलबजावणीसाठी आयआरडीए परवानाधारक विमा कंपनी निवडण्यात आली. विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा आणि विद्यार्थी वैयक्तिक विमा योजनेसाठी आयसीआयसीआय लोम्बार्ड विमा कंपनीची, तर विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा योजनेसाठी नॅशनल इन्शुरन्स कंपनीची निवड करण्यात आली. नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडून अपघात विमा योजनेतील पाच लाखांच्या विमा संरक्षणासाठी ६२ रुपये भरावे लागणार आहेत. आयसीआयसीआय लोम्बार्डच्या एक लाख रुपयांच्या अपघात विम्यासाठी २० रुपये, तर दोन लाख रुपयांच्या अपघात विम्यासाठी ४२२ रुपये भरावे लागतील. विशेष म्हणजे या योजनेत विद्यार्थ्यासोबतच त्याच्या पालकांपैकी एका व्यक्तीलाही हे संरक्षण मिळणार आहे. विमा योजना ऐच्छिक स्वरुपाच्या असल्याचे शासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांनी संबंधित कंपन्यांतून निवड करून या योजना विद्यार्थ्यांसाठी लागू कराव्यात. संबंधित विमा कंपन्यांचे विमा संरक्षण दर तीन वर्षांसाठी स्थिर असतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# यंदाचा हिवाळाही उष्ण; 'नोआ'चा अंदाज

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

प्रशांत महासागरातील एल-निनोच्या स्थितीची तीव्रता वाढत आहे. त्यामुळे यंदाचा हिवाळा आणि उन्हाळाही सरासरीपेक्षा जास्त उष्ण राहण्याचा अंदाज आहे. एल-निनोचे सुपर एल-निनोत रुपांतर झाल्यास पुढील मोसमी पावसाच्या हंगामावरही विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अमेरिकेतील नॅशनल ओशोनिक अँण्ड अॅटमोस्फेरिक अॅडमिनिस्ट्रेशनने (नोआ) दिलेल्या माहितीनुसार, एल-निनोची स्थिती मे महिन्यापर्यंत तीव्र होण्याची ८० टक्के शक्यता आहे. एल-निनोची स्थिती पुढील वर्षीही कायम राहून प्रशांत महासागराच्या पृष्ठभागावरील तापमान सरासरीपेक्षा १.५ अंश सेल्सिअसने वाढ होण्याचा अंदाज आहे. त्यात आणखी भर पडून समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान २ अंश सेल्सिअसने वाढून तीव्र एल-निनोची स्थिती निर्माण होण्याची ३० टक्के शक्यता आहे. तीव्र एल-निनो म्हणजे सुपर एल-निनोची स्थिती निर्माण झाल्यास उत्तर गोलार्धावर त्याचे विपरीत परिणाम दिसून येण्याची शक्यता आहे. एल-निनोची तीव्रता वाढल्यास किंवा पुढील वर्षीही एल-निनो सक्रिय राहिल्यास भारतात नैऋत्य मोसमी पावसावर विपरीत परिणाम होण्याची भीती आहे. वाऱ्याचा प्रवाह कमजोर राहून, कोरडे, कमी बाष्पयुक्त वारे भारतात दाखल झाल्यास सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची भीती आहे. यंदा एल-निनोमुळेच ऑगस्ट महिन्यात पावसाचा खंड पडल्याचे आणि जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर सरासरीपेक्षा उष्ण राहण्यामागे एल-निनो हे प्रमुख कारण असल्याचेही भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे.

# ‘प्रधानमंत्री आवास’च्या लाभार्थींना डिसेंबरपर्यंत ‘दिवाळी गिफ्ट’!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची प्रशासनाला सूचना

### ‘लकी ड्रॉ’ राबवून लाभार्थींना दिलासा देण्याची मागणी


। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी आणि आकुर्डी येथे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सदनिका बांधून पूर्ण झाल्या आहेत. मात्र, ‘लकी ड्रॉ’ न काढल्याने लाभार्थ्यांना अद्याप घरांचा ताबा मिळाला नाही. सुमारे ११ हजार नागरिकांनी अर्ज केले आहेत. त्यांचे लक्ष या सोडतीकडे आहे. त्यामुळे त्वरीत कार्यवाही करून ‘लकी ड्रॉ’ काढावा, अशी सूचना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला केली आहे.**



याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, ‘सर्वांसाठी घर’ या संकल्पनेतून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून ‘प्रधानमंत्री आवास योजना’ राबवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत महापालिकेमार्फत पिंपरी, आकुर्डीत बांधलेल्या ९३८ घरांसाठी अर्ज मागविले आहेत. १० हजार रुपये अनामत रक्कम व ५०० रुपये नोंदणी शुल्कासह इच्छुक नागरिकांनी अर्ज केले आहेत. रस्ते आरक्षणामध्ये बाधित झालेल्या नागरिकांसाठी आकुर्डी येथील गृहप्रकल्प राखीव ठेवला होता.

आकुर्डीत ५६८ सदनिका आणि पिंपरीत ३७० सदनिका एक वर्षापासून बांधून तयार आहेत. मात्र, प्रशासनाने या प्रकल्पांसाठी अद्याप ‘लकी ड्रॉ’ राबवलेली नाही.




पिंपरीतील सदनिकेसाठी पात्र लाभार्थ्यास सात लाख ९२ हजार रुपये, आकुर्डीतील सदनिकेसाठी सात लाख ३५ हजार २५५ रुपये स्वहिस्सा भरावा लागणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पिंपरीतील प्रकल्पासाठी ४ हजार ६४६ अर्ज, आकुर्डी प्रकल्पासाठी ६ हजार ६९२ अर्ज असे एकूण १० हजार ११३ अर्ज प्रशासनाकडे दाखल झाले आहेत. या अर्जांतून १३८ लाभार्थींना घर मिळणार आहे.

### ... तर डिसेंबरअखेर ताबा मिळेल!

‘प्रधानमंत्री आवास’ योजना अर्जाची छाननी करुन तात्काळ ‘लकी ड्रॉ’ काढणे अपेक्षीत आहे. सदर प्रकल्पाचे काम वर्षभरापूर्वीच पूर्ण झाले आहे. त्याची ‘लकी ड्रॉ’ लवकर काढल्यास डिसेंबरअखेर सदनिका ताब्यात मिळतील. लाभार्थींना कर्ज प्रक्रियेसाठीही वेळ लागणार आहे. त्यामुळे नवीन आर्थिक वर्षापूर्वी संबंधित लाभार्थी या प्रकल्पामध्ये हक्काच्या घरात स्थलांतरीत होतील, अशी व्यवस्था प्रशासनाने करावी. केंद्र सरकारकडून राबवण्यात आलेला महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, निश्चित लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा लाभ निर्धारित वेळेत मिळाला पाहिजे, अशा सूचना आमदार महेश लांडगे यांनी दिल्या आहेत.

> “ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वांसाठी घर या संकल्पनेतून प्रधानमंत्री आवास योजना देशभरात सक्षमपणे राबवली आहे. या योजनेच्या माध्यमातून केंद्र, राज्य सरकार, पीएमआरडीए आणि पीसीएमसीच्या पुढाकाराने पिंपरी-चिंचवड शहरात सुमारे १९ हजार घरांची निर्मिती होत आहे, ही निश्चितच समाधानाची बाब आहे. पिंपरी आणि आकुर्डी येथील प्रकल्पाचे काम वर्षभरापूर्वीच पूर्ण झाले आहे. आता डिसेंबरपर्यंत लाभार्थी निश्चित करुन घरांचा ताबा संबंधितांना द्यावा. ज्यामुळे नवीन वर्षामध्ये त्या नागरिकांना हक्काच्या घरात प्रवेश करता येईल. याबाबत प्रशासन सक्षमपणे कार्यवाही करेल, अशी अपेक्षा आहे.
>
> **- महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

# आमदार रोहित पवार यांची पुणे ते नागपूर ‘युवा संघर्ष यात्रा’

## पिंपरी-चिंचवड शहरातून पहिल्या टप्प्यात अडीच हजार युवक होणार सहभागी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एकीकडे आगामी निवडणुकांचा दृष्टीने सर्वच पक्षांकडून मोर्चेबांधणी केली जात असून राजकीय पक्षाकडून दौरे, पदयात्रा सुरु आहेत. यंदाच्या निवडणुकांत युवांचा आवाज घुमणार असल्याने आमदार रोहित पवार यांनी युवकांच्या प्रश्नांना हात घालत तब्बल ८०० किलोमीटरच्या युवा संघर्ष यात्रेचे आयोजन केले आहे. कंत्राटी भरती, पेपरफुटी आदींसह विविध प्रश्नांवर या यात्रदरम्यान विचारमंथन करण्यात येणार असल्याची माहिती आमदार रोहित पवार यांनी पिंपरी येथे पत्रकार परिषदेत दिली.**

यावेळी पत्रकार परिषदेला ज्येष्ठ नेते आझमभाई पानसरे, पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तुषार कामठे रविकांत वर्पे, माजी नगरसेविका सुलक्षणा शीलवंत, माजी नगरसेवक गणेश भोंडवे, शिरीष जाधव, सागर तापकीर आदी उपस्थित होते.

आमदार रोहित पवार येत्या २४ ऑक्टोबरपासून युवा संघर्ष यात्रा काढणार आहे. ही यात्रा ८०० किलोमीटरची पदयात्रा असून तब्बल १३ जिल्ह्यातून प्रवास करणार आहे. विजयादशमीच्या दुसऱ्या दिवशी पुण्यातून युवा संघर्ष यात्रेला सुरवात होणार असून ४५ दिवसांचा प्रवास करून ७ डिसेंबर रोजी नागपूरला याची सांगता होईल. पुण्यातील महात्मा फुले वाडा येथून या यात्रेला सुरवात होणार आहे. त्यांनतर वढू तुळापूर येथे नतमस्तक होऊन, यात्रेचा शुभारंभ होईल. संतांच्या,



महाराजांच्या भूमीतून यात्रा जाणार असून दररोज कमीत कमी १७ आणि जास्तीत जास्त २५ किमी असा पायी प्रवास असणार आहे. या पदयात्रेचा एक भाग म्हणून, आमदार रोहित पवार इतर असंख्य युवांसोबत पुणे ते नागपूर अशी पदयात्रा करतील आणि राज्यातील तरुण-तरुणींना भेडसावणाऱ्या विविध समस्या सोडवण्यासाठी जनतेशी संवाद साधतील. संपूर्ण पदयात्रेदरम्यान, युवांना त्यांची मतं आणि अपेक्षा व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे.

याबाबत माहिती देताना रोहित पवार म्हणाले की, ‘युवा संघर्ष यात्रा’ ही युवांच्या नेतृत्वाखालील एक चळवळ आहे, ज्याचा मूळ उद्देश महाराष्ट्रातील युवांना भेडसावणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी जनसमर्थन एकत्रित करणे आणि युवा वर्गाचा आवाज शासनापर्यंत पोहचवणे हा आहे. आज युवा म्हणून संवाद साधत आहे. ज्या दिवसापासून राजकारणात आलो, तेंव्हापासून युवांचे प्रश्न मांडणे अन त्यांच्या अडचणी सोडवण्याचे प्रयत्न करत आलो आहे. मतदारसंघाप्रमाणेच युवांच्या प्रश्नांना ही प्राधान्य मांडले आहे. कंत्राटी भरती, पेपरफुटी, शाळा दत्तक देण्याचा निर्णय आदी प्रश्नावर आवाज उठवला जाणार आहे. त्याचबरोबर आजच्या राजकारणाची परिस्थिती पाहता युवा नेत्यांनी राजकारणात आलो ही चूक झाली का? किंवा नव्या पिढीने राजकारणात यावं की नाही? असा प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.

### असा असणार युवा संघर्ष यात्रेचा प्रवास ..

राष्ट्रवादी शरद गटाचे आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून युवा संघर्ष यात्रेला येत्या २४ ऑक्टोबर रोजी सुरुवात होणार आहे. पुण्यातून या यात्रेला सुरुवात होईल. पुणे ते नागपूर असा हा ८०० किलोमीटरचा प्रवास असणार आहे. एकूण ४५ दिवसांचा प्रवास असून पुण्यातील तुळापूर येथून या यात्रेला सुरुवात होणार आहे. काष्टी, कर्जत, पाटोदा, बीड, जातेगाव, पिंपळगाव, कुंभार, परतुर, जिंतूर, सेनगाव, वनोजा, वाशिम, कारंजा, पापळ, पुलगाव, सेवाग्राम, बाजार गाव, नागपूर येथे या युवा संघर्ष यात्रेचा समारोप ७ डिसेंबर रोजी होणार आहे.




# अपघातांची जबाबदारी किती टाळणार?

**मोठा गाजावाजा करून बांधलेला नागपूर ते मुंबईपर्यंतचा समृद्धी महामार्ग भले राज्यकर्त्यांची स्वप्ने साकार करणारा असेल, पण यावरून प्रवास करणाऱ्या शेकडो प्रवाशांच्या जिवाला घोर लावणारा नक्कीच आहे. अद्याप पूर्ण न झालेल्या या मार्गावर अपघातांची मालिका काही थांबत नाही.**



शनिवारी मध्यरात्री या मार्गाने मराठवाड्यातील वैजापूरजवळ आणखी १२ बळी घेतले. वेगवान प्रवासासाठी तयार करण्यात आलेला हा मार्ग अल्पावधीत अपघातप्रवण म्हणून ओळखला जाणे हे राज्यकर्त्यांचे अपयशच. मात्र, याची जबाबदारी सरकारमधील कुणीही घ्यायला तयार नाही. चालक बेदरकारपणे वाहने हाकतात, मद्यप्राशन करतात, वाहतूक नियमांचे पालन करीत नाहीत अशी कारणे पुढे करून स्वत:ची कातडी वाचवण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. अपघात या कारणांमुळे होतात हे मान्यच, पण 'समृद्धी'वरील मृत्युसत्राला एक अन्य कारण आहे ते म्हणजे याची सदोष बांधणी. शिवाय उपाययोजनांचा अभाव हे आणखी एक महत्त्वाचे कारण. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने रस्ते बांधणीसाठी निश्चित केलेल्या मानकाचा विचार केला तर कितीतरी पटीने जास्त पैसा खर्च करून समृद्धी बांधला गेला. हा जादा पैसा खर्च करूनही या मार्गाची बांधणी सदोष आहे असे वारंवार घडणारे अपघात दाखवून देत असतील, तर मग दोषी कोण? त्यांना का पाठीशी घातले जात आहे? आणखी किती अपघातानंतर या चुकीची जबाबदारी निश्चित केली जाणार? अपघात घडला की समिती नेमण्याचा आभास तयार करून दोषींना वाचवण्याचा प्रयत्न का केला जात आहे? या मार्गाच्या बांधणीतून राज्यातील बहुतांश, त्यातही सर्वपक्षीय नेत्यांची 'समृद्धी' झाली हे यातले लखलखीत वास्तव. त्यावर पांघरूण घालण्यासाठी सारी चालढकल सुरू आहे असे समजायचे काय? वेगवान प्रवासासाठी निर्माण केलेल्या अशा मार्गावर अपघातांची शक्यता जास्त असते. ते टाळावेत म्हणून अनेक उपाययोजना आवश्यक ठरतात. त्या का केल्या जात नाहीत? ५४ हजार कोटी रुपये खर्चाच्या या महामार्गावर साधे कॅमेरे नाहीत, मध्ये थांबे नाहीत. कर्मचाऱ्यांची नियमित गस्त नाही. उपचार केंद्रे नाहीत, ठरवून दिलेल्या वेगापेक्षा कुणी सुसाट जात असेल तर त्याला अडवणारी वा इशारा देणारी यंत्रणा नाही. हे सारे मूळ आराखड्यात होते तर त्याची पूर्तता करण्याआधीच हा मार्ग खुला का करण्यात आला? यापैकी काही उपाययोजना उभारण्याची तयारी दर्शवणाऱ्या कंपन्यांच्या निविदा का रद्द करण्यात आल्या? कमिशनखोरी हे एकमेव कारण त्यामागे आहे असे बोलले जाते. ते खरे की खोटे याचे स्पष्टीकरण देण्याची हिंमत सरकार का दाखवत नाही? या निविदा वारंवार रद्द का होतात? त्यात नेमका कुणाला रस आहे? या मार्गावर पथकरवसुलीचे कंत्राट घेणारे नेमके कुणाचे समर्थक आहेत? ही वसुली म्हणजे मृतांच्या टाळूवरचे लोणी खाण्यासारखे नाही काय? अपघात घडला की चालक जबाबदार अशी विधाने करणाऱ्या राज्यकर्त्यांची जबाबदारी काहीच नाही असे समजायचे काय? आजवर आठशेपेक्षा जास्त अपघात या मार्गावर झाले. त्यातली बळीसंख्या दीडशेच्या घरात. एवढे मृत्यू होऊनही इतर रस्त्यांवरील अपघातांच्या तुलनेत हे प्रमाण फारच कमी, असा दावा सध्या सरकारी पातळीवर सुरू आहे. तो चीड आणणारा आहेच, शिवाय सरकारने गेंड्याची कातडी पांघरली या समजाला बळ देणारा. मुळात असे खर्चीक मार्ग हे निर्दोषच असायला हवेत. गुणवत्तेशी तडजोड न करता अशी कामे व्हायला हवीत. कंत्राटीकरणातून 'स्वहित' साधण्याची सवय लागलेल्या राज्यकर्त्यांनी याकडे साफ दुर्लक्ष केले. त्याची फळे आज सामान्य जनतेला भोगावी लागत आहेत. हा मार्ग जसजसा वाहतुकीसाठी खुला होत आहे, तसतशी अपघाताची स्थळे पुढे सरकत आहेत. यावरून याची बांधणीच सदोष असा निष्कर्ष कुणी काढला तर त्यात चूक काय? डांबराच्या तुलनेत खडबडीत पृष्ठभागाचे सिमेंटचे रस्ते व त्यामुळे होणारे अपघात ही या देशाची राष्ट्रीय समस्या होऊ घातली आहे.

## संपादकीय »

# आधी खिलाडूवृत्ती

***आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या १४१व्या सत्रासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी खास मुंबईत आले हे छानच.***

आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या १४१व्या सत्रासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी खास मुंबईत आले हे छानच. जवळपास ४० वर्षांनी अशा प्रकारचे सत्र भारतात आयोजित झाले आणि पंतप्रधानांनी त्याचा सुयोग्य वापर केला. सन २०३६ मधील ऑलिम्पिक स्पर्धेच्या यजमानपदासाठी भारत दावा सादर करेल आणि यात आम्ही कोणतीही कसर सोडणार नाही, असे पंतप्रधान म्हणाले. म्हणजे आजवर ज्याविषयी चर्चा-कुजबुज सुरू होती, ती बाब पंतप्रधानांनी जाहीरच करून टाकली. अलीकडे संपलेल्या आशियाई स्पर्धात भारताने पहिल्यांदाच पदकशंभरी गाठल्याने अलीकडे अनेकांस क्रीडा क्षेत्रातही अमृतकाल अवतरल्याचा साक्षात्कार होतो. हे सध्याच्या उत्सवप्रियतेस साजेसेच. पण आपल्या शंभरांचा आनंद साजरा करताना चीन आणि इवलासा दक्षिण कोरिया यांनी किती शंभर कमावले हे पाहणे शहाणपणाचे.

**मनोज जरांगे पाटील यांची सभा रविवारी आंतरवली सराटी गावानजीकच्या रामगव्हाण शिवारात झाली, तिला काही लाखांची गर्दी झाली होती हे लक्षणीय ठरले. अवघ्या दीड दोन महिन्यांत मनोज जरांगे पाटील यांचे नेतृत्व तयार झाले, हे या सभेने सिद्ध केले. एवढा प्रतिसाद, हेदेखील या सभेच्या परिणामकारकतेची आणि परिणामांचीही चर्चा होण्यासाठी एक महत्त्वाचे कारण ठरते.**

# जरांगे पाटील यांच्या प्रचंड सभेनंतर पुढे काय?

या सभेत सरकारकडे आरक्षणाच्या संदर्भात जरांगे पाटील यांनी दोन महत्त्वाच्या मागण्या केलेल्या आहेत, हे दिनांक १५ ऑक्टोबरच्या 'लोकसत्ता'तील बातमीतून स्पष्ट होते. एकंदर आरक्षणावरील ५० टक्केची मर्यादा अतिक्रमित करून सरकार आरक्षण देऊ शकणार नाही, हे आंदोलकांनी मान्य केलेले दिसून येते. किंवा ही मर्यादा मोडण्यासाठी सरकारला बरेच सव्यापसव्य करावे लागणार आहेत. आणि सरकारकडे तशी इच्छाशक्ती नाही, हे आता सर्वांना कळून चुकले आहे. असा प्रयत्न केला तरी त्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. तसेच त्यामध्ये कायद्याच्या अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे आरक्षणाच्या वरीलप्रमाणे मागण्या करणेच व्यवहार्य आहे, असे आंदोलकांना वाटत आहे, असे दिसते. ऐतिहासिकदृष्ट्या सध्याचे मराठा हे, शेतकरी या अर्थाने कुणबी आहेत, यात




शंका नाही. बरेच मराठे जात म्हणून कुणबी सांगतात, हेही खरे आहे. त्याला काही प्रमाणात ऐतिहासिक आधार असल्याचेही सांगण्यात येत आहे. पण सगळेच मराठे स्वतःला कुणबी जातीचे म्हणवून घेतील, असे वाटत नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे केवळ मराठेच नव्हे तर शेती करणाऱ्या इतर ओबीसी जातीही स्वतःला कुणबी म्हणवून घेतात, हेही स्पष्ट आहे. त्यामुळे कुणबी ही स्वतंत्र जात आहे, हे म्हणणे कठीण आहे. त्याहून तसे सिद्ध करणे अधिक अवघड आहे. तसेच कुणबी हा शब्द खास मराठा जातीसाठी राखीव नाही, हेही मान्य करावे लागेल. त्यामुळे सर्व मराठ्यांना ते सर्व कुणबी असल्याचे प्रमाणपत्र देणे कठीण वाटते. महाराष्ट्रात मराठा जातीची लोकसंख्या जवळपास ३२ टक्क्यांच्या आसपास असल्याचे सांगण्यात येते. एवढ्या मोठ्या लोकसंख्येने ओबीसीमध्ये हिस्सेदारी केल्यास ओबीसीच्या आरक्षणावर अत्यंत विपरीत परिणाम होईल हे कोणाच्याही सहजपणे लक्षात येईल. असे झाल्यास ओबीसी समाज शांत बसून राहील, यावर कोण विश्वास ठेवील? उलट अशा प्रकारच्या मागण्या मान्य केल्यास महाराष्ट्रातील जातीय विद्वेष वाढल्याशिवाय राहणार नाही, हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज नाही. आणि अशी स्थिती कोणत्याही सरकारला परवडणार नाही आणि पेलवणारही नाही. त्यामुळे सरकार अशी मागणी मान्य करणार नाही, हे सबंधितांच्या लक्षात यायला हवे. तरीही अशी मागणी केली जाते, याचे आश्चर्य वाटते. आंदोलकांनी दिलेला दुसरा पर्याय तर अत्यंत अव्यवहार्य आणि भीती निर्माण करणारा आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महामंडळ कर्ज व्याज परतावा योजनेतील सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली : चंद्रकांत पाटील

## भविष्यात व्याज परतावा प्रकरणे थकीत राहणार नाहीत

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत मराठा समाजातील व्यक्तींना व्यवसाय करण्यासाठी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना राबविण्यात येते. या योजनेतील आतापर्यंतचे व्याज परताव्याची सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत, अशी माहिती उपसमितीचे अध्यक्ष तथा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज दिले.**

मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण आणि सुविधांसाठी गठीत केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक आज मंत्रालयात संपन्न झाली. या बैठकीला ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, आमदार प्रवीण दरेकर अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष, माजी आमदार नरेंद्र पाटील,महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर,नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय,विधी व न्याय परामर्शी नितीन धोटे,उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी,सामान्य प्रशासन विभागाचे सचिव सुमंत भांगे, विधी व न्याय विभागाचे सचिव सतीश वाघोले,अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश मोहिते, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था (सारथी)



व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे उपस्थित होते. मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, महामंडळाकडे भविष्यात व्याज परतावा योजनेतील प्रकरणे थकीत राहणार नाहीत असे कालबद्ध पद्धतीने नियोजन करून त्या त्या महिन्याला तातडीने निकाली काढावीत अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी लागू करण्यात आलेल्या दहा टक्के आरक्षणाच्या लाभार्थ्यांची माहिती बैठकीत घेण्यात आली. या प्रवर्गातून मराठा समाजाला अधिक लाभ घेता आला असून हे प्रमाण शैक्षणिक क्षेत्रात साधारणपणे 75 टक्के पेक्षा अधिक तर शासकीय नोकरीमध्ये 85 टक्क्यां पेक्षा अधिक आहे. तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना वार्षिक उत्पन्नाचा दाखला दरवर्षी सादर करावा लागत होता. तो आता शैक्षणिक वर्षाच्या प्रथम वर्षाकरिता दाखल केल्यानंतर तो अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत ग्राह्य धरण्यात यावा असा निर्णय उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. प्रवर्गासाठी नॉन क्रिमिलियर बाबत जे निकष आहेत ते निकष ई डब्ल्यूएस प्रवर्गासाठी लागू करण्यासंदर्भात जी संदिग्धता आहे ती दूर करण्यासाठी तातडीने शासन निर्णय निर्गमित करण्याचे आदेश मंत्री श्री.पाटील यांनी बैठकीत दिले. ज्या जिल्ह्यात जागा उपलब्ध होण्यास अडचणी आहेत अशा ठिकाणी खासगी संस्थांकडून निविदा प्रक्रिया राबवून विद्यार्थ्यांना वसतिगृह सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यात यावीत या बाबत सविस्तर चर्चा बैठकीत करण्यात आली.

### मराठा समाजाला अधिक लाभ

» आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी लागू करण्यात आलेल्या दहा टक्के आरक्षणाच्या लाभार्थ्यांची माहिती बैठकीत घेण्यात आली. या प्रवर्गातून मराठा समाजाला अधिक लाभ घेता आला असून हे प्रमाण शैक्षणिक क्षेत्रात साधारणपणे 75 टक्के पेक्षा अधिक तर शासकीय नोकरीमध्ये 85 टक्क्यां पेक्षा अधिक आहे. तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना वार्षिक उत्पन्नाचा दाखला दरवर्षी सादर करावा लागत होता. तो आता शैक्षणिक वर्षाच्या प्रथम वर्षाकरिता दाखल केल्यानंतर तो अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत ग्राह्य धरण्यात यावा असा निर्णय उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला.

# बोरवणकरांचे सर्व आरोप दादांनी खोडले!

## मी बैठकांमध्ये नव्हतो कुठे माझी सही नाही

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे पोलिसांच्या येरवडा येथील तीन एकर जमिनीचा २०१०मध्ये विभागीय आयुक्तांनी लिलाव केला होता. तत्कालीन पालकमंत्री अजित पवार यांनी ही जमीन हस्तांतरित करण्याचा आदेश दिला होता मात्र आपण त्याला नकार दिला असा गौप्यस्फोट माजी पोलीस आयुक्त मीरा बोरवणकर यांनी नाव न घेता केला. त्यांच्या 'मॅडम कमिशनर' या आत्मचरित्रात याबाबत दावा करण्यात आला आहे. या आरोपांवर अजित पवारांनी उत्तर दिलं आहे.**





आज पत्रकार परिषद घेऊन त्यांनी सविस्तर उत्तर दिलं आहे. “माझं काम भलं आणि मी भला असं करत मी पुढे जात असतो. गेले तीन चार दिवस सातत्याने माध्यमांत बातम्या आल्या. मी त्या बातम्यांना जास्त महत्त्व दिलं नाही. अनेक वर्षे पुणे जिल्ह्याचा पालकमंत्री होतो. अपवाद मी सरकारमध्ये नव्हतो तो काळ होता. ज्या जिल्ह्याची माझ्यावर जबाबदारी असते त्या जिल्ह्याच्या विकासाचे प्रश्न मार्गी लावावे असा माझा प्रयत्न असतो. पालकमंत्री या नात्याने आढावा बैठका घेतो. अनेक बैठका घेत असतो. त्या कामाला कशी गती देता येईल, काही समस्या असतील तर सोडवता कसे येतील, याचा प्रयत्न असतो. एखादं काम होत नसेल तर ते का अडलेलं आहे यासाठी विविध विभागातील आढावा घेतो. म्हणून पुण्यातही मी आढावा बैठका घेत असतो. आता एका रिटायर्ड आयपीएस ऑफिसरने पुस्तक लिहिलं. त्या पुस्तकातून सातत्याने काहीतरी बातम्या येऊ लागल्या. यातून अजित पवार अडचणीत, चौकशी करा. पण, मी काहीही केलं नाही”, असं स्पष्टीकरण अजित पवारांनी दिलं आहे. यावेळी त्यांनी २००८ पासून यासंदर्भात झालेल्या बैठकांचेही इतिवृत्त पत्रकारांना वाचून दाखवले.

### एखाद्या जागेचा निर्णय मंत्रिमंडळाचा

» आपल्या येथे ३६ जिल्हे आहेत. ३६ जिल्ह्यांचे ३६ पालकमंत्री असतात. ते आपआपल्या पद्धतीने आढावा घेत असतात. एखाद्या जागेचा निर्णय मंत्रिमंडळाचा असतो. दुसरा अधिकार महसूल विभागाचा असतो. त्यामुळे (सरकारी) जागा महसूलाकडे वर्ग करावी लागते, त्यानंतर ती जागा कोणाला द्यायची हा निर्णय महसूल विभागाकडून घेतला जातो”, अशीही माहिती अजित पवारांनी दिली.

# भाजपाने महाराष्ट्र विकला : प्रणिती शिंदे

। नगर ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

गोरगरीबांचा आरक्षणाचा हक्क हिरावून घेण्यासाठी भाजपाने सहा बड्या कंत्राटदारांना महाराष्ट्र विकला आहे अशी टीका काँग्रेस आमदार प्रणिती शिंदे यांनी पंढरपूरमध्ये केली. पंढरपूरमध्ये आज एक आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. ही बैठक झाल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला, त्यावेळी हे वक्तव्य त्यांनी केलं आहे. सरकार खासगीकरण करतंय याबाबत विचारलं गेलं असता प्रणिती शिंदे म्हणाल्या, “मला कुणीतरी त्यादिवशी एक धक्कादायक गोष्ट सांगितली. मी एका शिक्षकांच्या कार्यक्रमाला गेले होते. त्यावेळी ते मला म्हणाले कदाचित, शिक्षकांची आमची ही शेवटची पिढी आहे. ते ऐकून माझ्या अंगावर काटा आला. सहा कंत्राटदारांना भाजपाने आणि या सरकारने महाराष्ट्र विकला आहे. बिंदुनामावली त्यामुळे रद्द होणार आहे, आरक्षण रद्द होणार आहे. हे सरकारचं एक षडयंत्र आहे. या विरोधात आम्ही सगळेच एक मोठा आवाज उठवला आहे. आरक्षण रद्द करत आहेत, त्यांच्या ठराविक लोकांनाच महाराष्ट्र विकला जातो आहे हे अतिशय धक्कादायक आहे. आमचे प्रांताध्यक्ष नाना पटोले यांनी काही दिवसांपूर्वी आढावा बैठका घेण्यास सांगितलं आहे. त्यानुसारच आम्ही आढावा घेत आहोत. आज पंढरपूरची बैठक पार पडली. पंढरपूर, मोहोळमध्ये मी बऱ्याचदा आली आहे. आज प्राथमिक स्वरुपात बैठक घेतली. बूथ यंत्रणा, विविध इतर गोष्टी याबाबत आम्ही आढावा घेतला. मागच्या दहा वर्षात देशात आणि राज्यात लोकांवर अन्याय होतो आहे.

# 2040 पर्यंत चंद्रावर मानव पाठवणार!

## » 2035 पर्यंत स्पेस स्टेशन तयार करा : पंतप्रधान मोदी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवार 17 ऑक्टोबर रोजी इस्रोच्या शास्त्रज्ञांसोबत बैठक घेतली. यामध्ये 21 ऑक्टोबर रोजी भारताच्या पहिल्या मानवी अंतराळ उड्डाण मोहिमेतील 'गगनयान' च्या क्रू एस्केप सिस्टमच्या चाचणीच्या तयारीची माहिती घेण्यात आली. PMO ने सांगितले की, भारताचे पहिले मानवी अंतराळ उड्डाण 2025 मध्ये होण्याची शक्यता आहे. बैठकीत पंतप्रधानांनी इस्रोच्या शास्त्रज्ञांना सांगितले की 2035 पर्यंत स्पेस स्टेशन बनवण्याच्या आणि 2040 पर्यंत चंद्रावर मानव पाठवण्याच्या योजनेवर आपण काम केले पाहिजे.**

पंतप्रधानांनी व्हीनस ऑर्बिटर मिशन आणि मार्स लँडरवर काम करण्यास सांगितले. इस्रो 21 ऑक्टोबर रोजी सकाळी 7 ते 9 या वेळेत 'गगनयान' मिशनच्या क्रू एस्केप सिस्टमची चाचणी घेईल. सोप्या भाषेत, मोहिमेदरम्यान रॉकेटमध्ये काही बिघाड झाल्यास, अंतराळवीराला सुरक्षितपणे पृथ्वीवर आणणाऱ्या यंत्रणेची चाचणी घेतली जाईल. श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून गगनयान मिशनचे चाचणी वाहन निरस्तीकरण मिशन-1 (TV-D1) प्रक्षेपित केले जाईल. या उड्डाणाचे तीन भाग असतील - ॲबॉर्ट मिशनसाठी बनवलेले सिंगल स्टेज लिक्विड रॉकेट, क्रू मॉड्यूल आणि क्रू एस्केप सिस्टम. गगनयान मिशन अंतर्गत, इस्रोने पुढील वर्षाच्या सुरुवातीला गगनयान



मिशनच्या पहिल्या मानवरहित मिशनची योजना आखली आहे. मानवरहित मोहिमेच्या यशानंतर एक मानवयुक्त मिशन असेल ज्यामध्ये मानव अंतराळात जाईल. यापूर्वी, इस्रोने चंदीगडमध्ये 8 ते 10 ऑगस्ट दरम्यान गगनयान मोहिमेसाठी ड्रग पॅराशूटची यशस्वी चाचणी केली होती. हे पॅराशूट अंतराळवीरांच्या सुरक्षित लँडिंगसाठी मदत करेल. यामुळे क्रू मॉड्युलचा वेग कमी होईल, तसेच तो स्थिर राहील. त्यासाठी चाचणीदरम्यान अंतराळवीरांच्या लँडिंगसारखी परिस्थिती निर्माण झाली होती. 'गगनयान' मध्ये, 3 सदस्यांची टीम 3 दिवसांच्या मोहिमेसाठी पृथ्वीच्या 400 किमी वरच्या कक्षेत पाठवली जाईल. यानंतर क्रू मॉड्युल समुद्रात सुरक्षितपणे उतरवले जाईल. जर भारत आपल्या मिशनमध्ये यशस्वी झाला तर असे करणारा तो चौथा देश ठरेल. याआधी अमेरिका, चीन आणि रशियाने हे केले आहे. पंतप्रधान मोदींनी 2018 साली स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात गगनयान मिशनची घोषणा केली होती. हे मिशन २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. मात्र, कोविड महामारीमुळे त्यास विलंब झाला. आता ते 2024 च्या अखेरीस किंवा 2025 च्या सुरुवातीला पूर्ण होण्याची शक्यता आहे. या मोहिमेसाठी इस्रो चार अंतराळवीरांना प्रशिक्षण देत आहे. बंगळुरू येथे स्थापन केलेल्या अंतराळवीर प्रशिक्षण सुविधेत वर्ग प्रशिक्षण, शारीरिक तंदुरुस्ती प्रशिक्षण, सिम्युलेटर प्रशिक्षण आणि फ्लाइट सूट प्रशिक्षण दिले जात आहे.

### गगनयानसाठी पॅराशूटची चाचणी

» भविष्यातील मानव मोहिमेसाठी टीमचा विस्तार करण्याचीही इस्रोची योजना आहे. गगनयान मोहिमेसाठी अंदाजे 90.23 अब्ज रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. इस्रोने 8 ते 10 ऑगस्ट दरम्यान गगनयान मोहिमेसाठी ड्रग पॅराशूटची यशस्वी चाचणी केली होती. हे पॅराशूट अंतराळवीरांच्या सुरक्षित लँडिंगसाठी मदत करेल. यामुळे क्रू मॉड्युलचा वेग कमी होईल, तसेच तो स्थिर राहील. त्यासाठी चाचणीदरम्यान अंतराळवीरांच्या लँडिंगसारखी परिस्थिती निर्माण झाली होती. गगनयान मिशनची पहिली मानवरहित मोहीम पुढील वर्षाच्या सुरुवातीला नियोजित आहे. मानवरहित मोहिमेच्या यशानंतर एक मानवयुक्त मिशन असेल ज्यामध्ये मानव अंतराळात जाईल.

# भाजप-आरएसएसची देशाबाबत मते वेगळी!

## » एक विचार, एका संस्थेने देश चालवा: राहुल गांधी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेस खासदार राहुल गांधी दोन दिवसांच्या मिझोराम दौऱ्यावर आहेत. दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी राहुल यांनी मिझोराममधील काँग्रेस नेत्यांची बैठक घेतली. यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. ते म्हणाले की, भाजप आणि आरएसएसचा देशाबाबत वेगळा विचार आहे. भाजप भारताची संस्थात्मक रचना काबीज करण्याचा प्रयत्न करत आहे राहुल म्हणाले की, आमचा विश्वास आहे की भारत हा राज्यांचा संघ आहे, जिथे सर्व संस्कृती, सर्व धर्म, सर्व इतिहास जतन करणे आवश्यक आहे. काँग्रेसने देशाची मूलभूत रचना तयार करण्यास मदत केली आणि तिचे संरक्षण करण्याचा नेहमीच प्रयत्न केला.**

या दौऱ्याच्या माध्यमातून राहुल मिझोरामच्या लोकांना विशेषत: तरुणांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. पहिल्या दिवशीच्या जाहीर सभेनंतर राहुल यांनी सायंकाळी आयझॉलमधील तरुणांशी थेट संवाद साधला. त्याचवेळी राहुल आयझॉलमध्ये पोहोचताच काँग्रेसने मिझोराम विधानसभेच्या 40 पैकी 39 जागांसाठी उमेदवारांची नावे जाहीर केली. राहुल आज लुंगलेई शहराला भेट देतील आणि तेथे जाहीर सभा घेणार आहेत. राहुल मंगळवारी लुंगलेई येथून हेलिकॉप्टरने आगरतळामार्गे दिल्लीला रवाना होतील, असे त्यांनी सांगितले. आपल्या मिझोरम भेटीबद्दल बोलताना राहुल गांधी म्हणाले की, त्यांना मिझोराममध्ये यायला आवडते. आयझॉलच्या जनतेने काल पदयात्रेला पूर्ण पाठिंबा दिला. 'भारत जोडो यात्रा' या थीमवर आम्ही हा प्रवास केला.

राहुल म्हणाले की, झेडपीएम-एमएनएफ मिझोराममध्ये स्थापित करण्यासाठी भाजप-आरएसएसला मदत करत आहे. पण काँग्रेस हे कधीच करणार नाही. कारण आमची विचारधारा त्यांच्यापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे.

ते म्हणाले- भाजपने आखलेल्या धोरणांवर नजर टाकली तर हे स्पष्ट होते की, हे सर्व लहान आणि मध्यम उद्योगांना उद्ध्वस्त करण्यासाठी आणि त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी हे केले गेले आहे. अदानी आणि 3-4 मोठ्या उद्योगपतींना मदत करण्यासाठी आणि उद्योजक आणि लहान व्यावसायिकांवर हल्ला करून त्यांना संपवण्यासाठी नोटाबंदी, जीएसटी आणि कृषी कायदे आणले गेले.



### इस्रायल-हमास युद्धात इतका रस का ?

» नरेंद्र मोदी मणिपूरपेक्षा इस्रायलमध्ये घडणाऱ्या घटनांबाबत अधिक चिंतित आहेत. 3 मे पासून हिंसाचाराचा सामना करत असलेले मणिपूर आता एक राज्य राहणार नाही तर जातीच्या आधारावर दोन भागात विभागले जाईल. आश्चर्याची गोष्ट आहे की देशाच्या पंतप्रधानांना आणि भारत सरकारला इस्रायल-हमास युद्धात इतका रस का आहे?

# खासदार राघव चड्ढांना न्यायालयाचा दिलासा!


। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

आम आदमी पार्टीचे राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांना दिल्ली उच्च न्यायालयाने मंगळवारी (१७ ऑक्टोबर) दिलासा दिला आहे. राघव चड्ढा यांना राज्यसभा सचिवालयाने दिलेला टाइप-७ बंगला रिकामा करावा लागणार नाही. कारण, सत्र न्यायालयाने राघव चड्ढा यांना सरकारी बंगला रिकामा करण्याचे आदेश दिले होते. त्या आदेशावर दिल्ली उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. याप्रकरणी उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत ही स्थगिती तशीच राहील. खासदार राघव चड्ढा यांना पटियाला हाऊस कोर्टाने सरकारी बंगला रिकामा न केल्यामुळे सुनावलं होतं. राज्यसभा सचिवालयाने चड्ढा यांना दिलेला टाइप ७ बंगला रिकामा करण्याचे आदेशही दिले होते. परंतु, राघव चड्ढा यांनी हा बंगला रिकामा करण्यास विरोध दर्शवत दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर आज सुनावणी झाली आणि उच्च न्यायालयाने चड्ढा यांना बंगला रिकामा करण्याच्या राज्यसभा सचिवालयाच्या निर्णयावर स्थगिती दिली आहे. नियमानुसार राघव चड्ढा यांना टाईप ५ किंवा टाईप ६ बंगल्यात राहण्याचा अधिकार आहे. परंतु, त्यांना टाईप ७ बंगला देण्यात आला आहे. त्यामुळे सचिवालयाने त्यांना बंगला रिकामा करण्याचे आदेश दिले होते. त्याविरोधात राघव चड्ढा यांनी पटियाला हाऊस कोर्टात धाव घेतली होती. पटियाला हाऊस कोर्टानेही राघव चड्ढा यांना बंगला रिकामा करण्याचे आदेश दिल्यानंतर आता राघव चड्ढा यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली होती. आप खासदार राघव चड्ढा यांना सातव्या श्रेणीचा बंगला (TYPE 7) देण्यात आला आहे. सातव्या श्रेणीचा बंगला माजी केंद्रीय मंत्री, माजी राज्यपाल, माजी मुख्यमंत्री आणि लोकसभा अध्यक्ष राहिलेल्या खासदारांनाच दिला जातो. बंगल्याच्या दर्जानुसार ही दुसऱ्या क्रमांकाची श्रेणी आहे. राज्यसभा सदस्य हँडबूकमधील नियमावलीप्रमाणे राघव चड्ढा टाईप ७ बंगल्यासाठी पात्र नाहीत.

# शारदीय नवरात्रौत्सवात पर्यटनासाठी 'या' ठिकाणांची करा निवड!

पुणे : भारतात नवरात्रीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. विशेषतः शारदीय नवरात्रीमध्ये दुर्गा मातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. तसेच पूजेसाठी मंडप उभारले जातात. देशातील अनेक ठिकाणी गरबा कार्यक्रमांचे आयोजन केले जातेयंदा शारदीय नवरात्री 15 सप्टेंबर ते 24 ऑक्टोबर दरम्यान साजरा होता असून यादरम्यान अनेक सुट्ट्या आहेत. या दिवसांत तुम्हाला नवरात्रीचा आनंद घ्यायचा असेल, तर तुम्ही या ठिकाणांना भेट देवू शकता. आम्ही तुम्हाला हा सण अनुभवण्यासाठी काही उत्तम ठिकाणांची माहिती सांगत आहोत. या ठिकाणी तुम्ही भेट दिला तर कधीही नवरात्रीचा प्रसंग विसरणार नाही...






## कोलकाता

नवरात्रोत्सव साजरा करण्यासाठी कोलकाता हे एक उत्तम ठिकाण आहे. नवरात्रीच्या काळात, पश्चिम बंगालच्या प्रत्येक कोपऱ्यात दुर्गा देवीच्या मोठ्या मूर्ती बनवता येतात. त्या मोठ्या पंडालमध्ये ठेवल्या जातात. कोलकात्यात नवरात्रोत्सव दुर्गा पूजा किंवा दुर्गोत्सव म्हणून ओळखला जातो.


## अहमदाबाद

गुजरातमधील नवरात्र हा जगातील सर्वात मोठा पारंपरिक नृत्य उत्सव आहे. या 9 दिवसांमध्ये गुजराती लोक चमकदार रंगाच्या कपड्यांमध्ये दांडिया आणि गरबाच्या तालावर नाचताना दिसतात. इथे गरबा नाईटला नक्की जावे, असे सांगितले जाते.



## वाराणसी

वाराणसी हे उत्तर प्रदेशातील सर्वात पवित्र शहरांपैकी एक आहे. येथे नवरात्रोत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. येथे हजारो दिवे वाराणसीच्या घाटांना प्रकाशित करतात. रामचरितमानसचे मंत्र दहा दिवस संपूर्ण शहरात गुंजतात. उत्तर प्रदेशातील नवरात्रीतीत रामलीला हा एक नृत्य प्रकार सर्वाधिक लोकप्रिय आहे. ते पाहण्यासाठी दरवर्षी लाखो लोक येतात.



## म्हैसूर

नवरात्रीच्या दरम्यान कर्नाटकला भेट देण्याचे मुख्य कारण म्हणजे हजारो दिव्यांनी उजळून निघालेल्या म्हैसूर रॉयल पॅलेसला भेट देणे. दसऱ्याला येथे नधब्बा सण म्हणूनही ओळखले जाते. हा दहा दिवसांचा उत्सव आहे. ज्यामध्ये संपूर्ण म्हैसूरमध्ये अनेक नृत्यांचे प्रकार सादर केले जातात आणि गायनही होते.

## वैष्णो देवी मंदिर

श्री वैष्णोदेवी मंदिराची सजावट केली जाते. यानिमित्त लाखो लोक दर्शनासाठी येतात. कतारपासून 14 किमी अंतरावर उंच टेकडीवर असलेल्या वैष्णो देवी धाममध्ये 9 दिवस वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

# नेदरलँड्सचा दक्षिण आफ्रिकेला दे धक्का!

## नेदरलँड्सचा धरमशालामध्ये 38 धावांनी दिमाखदार विजय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**विश्वचषक २०२३ मध्ये अफगाणिस्तान विरुद्ध इंग्लंड सामन्यानंतर दुसरा मोठा धक्का नेदरलँडने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत एक इतिहास रचला. मंगळवारी १७ ऑक्टोबर रोजी धरमशाला येथे झालेल्या सामन्यात टी२० विश्वचषक २०२२ची पुनरावृत्ती करत दक्षिण आफ्रिकेला एकदिवसीय विश्वचषकात देखील चारीमुंड्या चीत केले. पावसाने प्रभावित झालेल्या सामन्यात नेदरलँडने ३८ धावांनी ऐतिहासिक विजयाची नोंद केली. नेदरलँडचा कर्णधार स्कॉट एडवर्ड्सने शानदार अर्धशतकी खेळी केली. या विजयाने आता पुन्हा एकदा गुणतालिकेत तळाच्या संघांना उपांत्य फेरीत जाण्याचे दरवाजे उघडले आहेत.**



नेदरलँड्सने दक्षिण आफ्रिकेचा ३८ धावांनी पराभव केला आहे. या विश्वचषकातील दुबळ्या संघाने केलेला दुसरा मोठा पराभव आहे. यापूर्वी अफगाणिस्तानने इंग्लंडचा पराभव केला होता. पावसाने व्यत्यय आणलेल्या या सामन्यात दोन्ही डावांतून प्रत्येकी सात षटके कमी करण्यात आली. अशा परिस्थितीत ४३ षटकांच्या या सामन्यात नेदरलँडने प्रथम फलंदाजी करताना आठ गडी गमावून २४५ धावा केल्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेचा संघ ४२.५ षटकांत केवळ २०७ धावा करू शकला आणि सामना ३८ धावांनी गमावला. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना नेदरलँडने ४३ षटकांमध्ये ८ बाद २४५ धावा केल्या. तसेच, प्रत्युत्तरात धावांचा पाठलाग करण्यासाठी फलंदाजीला आलेल्या दक्षिण आफ्रिका संघाच्या पहिल्या चार विकेट्स स्वस्तात पडल्या. एकंदरीत दक्षिण आफ्रिका संघ चांगलाच अडचणीत आल्याचे पाहायला मिळाले. २४६ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी दक्षिण आफ्रिका संघ मैदानात आल्यानंतर त्यांच्या पहिल्या चार विकेट्स एकापाठोपाठ एक अशा पडल्या. संघाची धावसंख्या ११.२ षटकात ४४ असताना आफ्रिकेने पहिल्या चार विकेट्स गमावल्या होत्या. टेंबा बावूमा १६, क्विंटन डी कॉक २०, रासी वॅन डर ड्यूसेन ४, तर एडेन मार्करम १ धाव करून तंबूत परतले. एकदिवसीय विश्वचषक २०२३ इंग्लंडपाठोपाठ दक्षिण आफ्रिकेचा संघही पराभवाचा बळी ठरला आहे. आफ्रिकेचा या विश्वचषकातील तीन सामन्यांतील हा पहिलाच पराभव आहे. याआधी या संघाने श्रीलंका आणि ऑस्ट्रेलियाला पराभूत केले होते, मात्र नेदरलँडचा संघ मोठा पराभव करण्यात यशस्वी ठरला होता. पावसामुळे सामना उशिरा सुरू झाला आणि दोन्ही डाव प्रत्येकी सात षटकांचे करण्यात आले. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. नेदरलँडची सुरुवात काही खास नव्हती. निम्मा संघ ८२ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला होता. यानंतर कर्णधार एडवर्ड्सने शेपटीच्या फलंदाजांसोबत उत्कृष्ट भागीदारी करत संघाला चांगल्या धावसंख्येपर्यंत नेले. नेदरलँड्सकडून कर्णधार चार्ल्स एडवर्ड्सने नाबाद ७८ धावा केल्या. व्हॅन डर मर्वेने २९ आणि आर्यन दत्तने ९ चेंडूत २३ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून लुंगी एनगिडी, मार्को जॅनसेन आणि कागिसो रबाडा यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. जेराल्ड कोएत्झी आणि केशव महाराज यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. २४६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची सुरुवातही काही खास नव्हती. ३६ धावांवर पहिली विकेट पडली. डी कॉक २० धावा करून बाद झाला. यानंतर बावुमाने १६ धावांची वैयक्तिक धावसंख्या सुरू ठेवली. मार्कराम एक धावा करून बाद झाला तर डसेन चार धावा करून बाद झाला. क्लासेन आणि मिलरने पाचव्या विकेटसाठी ४५ धावांची भागीदारी करून काही आशा उंचावल्या, पण क्लासेन बाद झाल्यानंतर मिलर एकाकी पडला. यानसेन नऊ धावा करून बाद झाला. यानंतर मिलरनेही ४३ धावा केल्या आणि दक्षिण आफ्रिकेचा पराभव निश्चित झाला.

### पावसामुळे सामना उशिरा सुरू

या सामन्याचे वैशिष्ट्य म्हणजे दक्षिण आफ्रिकेच्याच माजी खेळाडूने त्याच्याच संघाला आज पराभूत केले. रॉल्फ वॅन डर मर्व मूळचा दक्षिण आफ्रिकेचा आहे. सध्या तो नेदरलँड संघाकडून विश्वचषक खेळत आहे. त्याने फलंदाजी आणि गोलंदाजीमध्ये आजच्या सामन्यात महत्वाची भूमिका पार पाडली. त्याने १९ चेंडूत २९ धावांची महत्वपूर्ण खेळी केली. कर्णधार स्कॉट ऍडवर्ड्सनंतर ही नेदरलँड संघासाठी सर्वात मोठी खेळी ठरली. रॉल्फने दक्षिण आफ्रिका संघाकडून कारकिर्दीत २९ आंतरराष्ट्रीय सामने खेळळे आहेत. यातील १७ सामन्यांमध्ये आफ्रिकी संघ जिंकला, तर १० सामन्यात पराभूत झाला.

# रोहितच्या कॅप्टन्सीने पॉटिंग प्रभावित!

## रोहित भारताला विश्वचषक मिळवून देऊ शकतो

। कोल्हापूर । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महान ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू रिकी पॉंटिंगचा विश्वास आहे की कर्णधार रोहित शर्मा भारताला त्यांच्याच भूमीवर दुसरा विश्वचषक मिळवून देऊ शकतो. सलग तीन विजयांसह भारताने आपल्या विश्वचषक मोहिमेची शानदार सुरुवात केली आहे. पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा सहा गडी राखून पराभव केल्यानंतर भारताने दुसऱ्या सामन्यात अफगाणिस्तानचा आठ गडी राखून आणि तिसऱ्या सामन्यामध्ये पाकिस्तानचा सात गडी राखून पराभव केला. या तीनही सामन्यातील रोहित शर्माची कॅप्टन्सी आणि त्याने घेतलेले निर्णयांवर रिकी पॉंटिंग खूप प्रभावित झाला आहे.**



### विराट हा खूप भावनिक खेळाडू

विराट हा खूप भावनिक खेळाडू आहे. तो चाहत्यांचे सगळचं ऐकतो आणि त्यांना प्रतिसादही देतो. त्याच्यासारख्या व्यक्तींसाठी हे काम थोडे अवघड गेले असते." पॉंटिंग असही म्हणाला, "रोहितला या विश्वचषकात कोणतीही अडचण येणार नाही. तो एक समंजस खेळाडू आहे आणि खूप चांगले नेतृत्व करत आहे." टीम इंडियाने शेवटचा विश्वचषक २०११मध्ये श्रीलंकेला अंतिम फेरीत पराभूत करून भारताच्याच भूमीवर जिंकला होता.

पॉंटिंग आयसीसीच्या पॉडकास्टमध्ये म्हणाला, "रोहित पूर्णपणे त्याच्या निर्णयांशी ठाम असून त्याला नक्की काय करायचे आहे, हे माहित आहे. तो दबावातही विचलित होत नाही, हे त्याच्या फलंदाजीतही दिसून येते. तो एक हुशार आणि चतुर फलंदाज आहे. वर्ल्डकपमध्ये दबावाला सामोरे जाण्यासाठी मैदानावर आणि बाहेर त्याने केलेल्या योजना स्पष्टपणे दिसून येतात. सामन्यातील सगळे निर्णय हे योग्य घेण्याचे कौशल्य त्याच्यात दिसत आहेत."

रोहित डिसेंबर २०२१मध्ये विराट कोहलीच्या जागी भारताचा कर्णधार झाला. रोहितच्या नेतृत्वाखाली विराट आपल्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित करू शकतो, असा विश्वास पॉंटिंगला आहे.

पॉंटिंग पुढे म्हणाला, "विराट हा खूप भावनिक खेळाडू आहे. तो चाहत्यांचे सगळचं ऐकतो आणि त्यांना प्रतिसादही देतो. त्याच्यासारख्या व्यक्तींसाठी हे काम थोडे अवघड गेले असते." पॉंटिंग असही म्हणाला, "रोहितला या विश्वचषकात कोणतीही अडचण येणार नाही.

# गांगुलीच्या खास विक्रमावर रोहितचे लक्ष्य

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

विश्वचषक २०२३चा उत्साह शिगेला पोहचला आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने पहिले तीन सामने जिंकले आहेत. त्यांचा पुढचा सामना बांगलादेशविरुद्ध पुण्यात १९ ऑक्टोबरला होणार आहे. या सामन्यात आणि संपूर्ण विश्वचषकात रोहित आपल्या नावावर एक खास विक्रम करू शकतो. ज्या वेगाने तो फलंदाजी करत आहे, त्यामुळे तो हा विक्रम मोडण्यात यशस्वी होईल, अशी आशा आहे. वास्तविक, कर्णधार म्हणून विश्वचषकाच्या एकाच मोसमात सर्वाधिक धावा करण्याचा भारतीय खेळाडूचा हा विक्रम आहे. या बाबतीत महेंद्रसिंग धोनीचा विक्रम रोहितच्या सर्वात जवळ आहे. कर्णधार म्हणून रोहितचा हा पहिलाच एकदिवसीय विश्वचषक आहे. ३६ वर्षीय रोहितने या विश्वचषकात आतापर्यंत तीन डावात ७२च्या सरासरीने २१७ धावा केल्या आहेत. यामध्ये एक शतक आणि एका अर्धशतकाचा समावेश आहे. स्पर्धेत भारतीय संघाकडून सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. धोनीने २०११च्या विश्वचषकात २४१ धावा आणि २०१५च्या विश्वचषकात २३७ धावा केल्या होत्या. २५ धावा करताच रोहित धोनीचा विक्रम मोडेल. कपिल देव, विराट कोहली आणि सौरव गांगुली यांचे रेकॉर्डही रोहितच्या निशाण्यावर असतील. १९८३च्या विश्वचषकात भारतीय संघाला चॅम्पियन बनवणारा कर्णधार कपिल देव याने या स्पर्धेत ३०३ धावा केल्या होत्या. त्याचा विक्रम मागे ठेवण्यासाठी रोहितला ८७ धावांची गरज आहे. त्याचवेळी विराट कोहलीने २०१९ विश्वचषकात पाच अर्धशतकांच्या मदतीने ४४३ धावा केल्या होत्या.